


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# टाहो या कादंबरीतील आदिवासींचे जीवन

**श्री.चिकाळकर सुभाष शंकर**
पद्मश्री वि. पा. कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
प्रवरानगर ता. राहता जि. अहमदनगर

**प्रास्ताविक:**

साठोत्तरी साहित्यप्रवाहाने मराठी साहित्याला एक नवी ओळख करून दिलेली आहे. या साहित्यप्रवाहामध्ये आदिवासी साहित्याने आपली मजल मारली. साठोत्तरी साहित्यप्रवाहामध्ये दलित साहित्यप्रवाह, स्त्रीवादी साहित्यप्रवाह, ग्रामीण साहित्यप्रवाह, आदिवासी साहित्यप्रवाह, भटके-विमुक्त साहित्यप्रवाह, मुस्लीम साहित्यप्रवाह अशा विविध साहित्यप्रवाहातून निर्माण झाले असले तरी खऱ्या अर्थाने आदिवासी साहित्यप्रवाह हा 1980 नंतरच पुढे आलेला दिसतो आहे.

आदिवासी समूह हा भारतातील मूळ रहीवासी असून आर्यांच्या युद्धानंतर या आदिवासींनी आपले वास्तव्य डोंगर दऱ्यात, नदी खोऱ्यात, कापारीत, गावगाड्यापासून कोसो मैल दूर, जंगल झाडीत वास्तव्यास गेलेले आहेत. आधुनिक भारताच्या जडण घडणीत आदिवासींचा सिंहाचा वाटा आहे. ब्रिटिश विरोधात आदिवासींनी अनेक चळवळी निर्माण केल्या. या चळवळीच्या माध्यमातून आदिवासींमध्ये जनजागृती करत ब्रिटिशांविरोधात उठाव केलेले आहेत. सशस्त्र लढाही केलेला आहे. याची नोंदही काही इतिहासकारांनी घेतलेली आहे. आदिवासींनी आपली प्राचीन संस्कृती, निसर्ग, रुढी, प्रथा, परंपरा याची तुलना प्रास्थापित समाजाशी करू लागला. यातून आलेल्या जीवनानुभवातून आपल्या साहित्य लेखनीतून अभिव्यक्त होऊ लागला. तत्पूर्वी मराठी साहित्यामध्ये आदिवासी समाजाबद्दल आलेले चित्रण हे मनोरंजनवादी, काल्पनिक स्वरुपाचे होते.

आदिवासींच्या कादंबरीतील लेखकाने अनेक आदिवासींचे प्रश्न हाताळलेले आहेत. हा प्रश्न उभा करताना नवलेखकाने त्यांच्या वाट्याला आलेले जगणे आणि निसर्गाशी असणारे नाते सांगणारे आदिवासी जीवन रेखाटताना व्यथा, वेदना आणि

जागतिकीकरणातून आदिवासींचे होणारे हालअपेष्टांचे चित्रणही ते करतात. दलित साहित्याने माणूस केंद्रस्थानी ठेवून लेखन केलेले असले तरीही आदिवासी साहित्याने माणसाबरोबर त्यांच्या वाट्याला आलेले जीवनप्रश्न मांडत आपल्या साहित्य लेखनाची सुरुवात केलेली आहे. आदिवासींच्यवा कादंबरीची मांडणी करताना आदिवासींच्या वाट्याला आलेले अस्सल जीवन अनुभव, वास्तव जीवनातील प्रसंग रेखाटलेले आहेत. त्यामुळे आदिवासी कांदबरीतून प्रकट होणाऱ्या आदिवासींच्या जीवन जाणिवा, निसर्ग प्रथा व परंपरा, त्यांचे सण उत्सव सांस्कृतिक देवाण घेवाण, चालीरीती, स्त्री-पुरुष जीवन, राहणीमान, खानपान, त्यासोबतच आदिवासींमध्ये पिढ्यानपिढ्या चातल आलेले व्यासनाधिनता, आंधश्रद्धा, त्यांच्या कादंबरीतून प्रकटीकरण होतानाचे चितर पाहावयास मिळते.

1990 च्या दशकात निर्माण झालेले खाऊजा म्हणजे खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यात होणारे आदिवासी समाजाचे हाल व पारंपरिक व्यावसायाची होणारी हेळसांड याची मांडणीही आदिवासी कादंबरीकराने केलेली आहे. यावर डॉ. भीमराव वानोळे लिहितात की, “आदिवासी कादंबरी ही आदिवासींच्या व्यथा, वेदना, दुख कष्ट अभिव्यक्त करून थांबत नाहीत तर त्या अन्याय, अत्याचाराला तोंड फोडण्याचे कार्य आदिवासी कादंबरी करीत असल्याचे दिसते.”[1] भीमराव वानोळे यांनी आपल्या विशेष संदर्भातून मांडणी करताना आदिवासी मध्ये असणारे जमातीय घटक आणि त्यांच्या उपजमातींचा उल्लेखही नकळतपणे केलेला आहे. असे असले तरीही आदिवासी जमाती मध्ये असणात्या पोटजमातींचेही प्रश्न अधोरेखित केलेले आहेत.

**टाहो कादंबरीतील समाजजीवन :**

बाबाराव मडावी यांनी टाहो या कादंबरीतून आंध जमातीचे चित्रण रेखाटलेले आहे. खर तर बाबाराव मडावी यांनी आंध जमातीचा टाहो न मांडता एकूण आदिवासी जमातींचा टाहो, आक्रोश आणि वेदना यातून समोर आणलेल्या आहेत. “दलित व आदिवासी साहित्यीच जातकुळी मिळतीजुळती आहे. दुःखाची तीव्रता सारख्या प्रमाणात व्यक्त होणारी आहे. तसेच लेखकाने ही कादंबरी डॉ. आंबेडकर व आंध जमातीच्या

सहनशीलतेला अर्पण केली आहे. ही बाब विचारार्ह अशी आहे. सामाजिक बांधिलकी व जाणीव वृध्दींगत करणारी परिवर्तनशील वाटचाल आहे."[2] या कादंबरीच्या सुरुवातीलाच सुदू काका आणि त्यांच्या गावाचे वर्णन केलेले आहे. आदिवासी जमात म्हटले की दारु हा त्यांचा मुख्य व्यवसाय समोर येतोच. गावात दारू पिणारे काही ठरवीक व्यक्ती असल्या तरीही या आदिवासी गावात मात्र संपूर्ण लोकच दारू पिणारे आहेत. दारु आणि शिकार हा आदिवासींचा ठरलेला दिनक्रम आहे. या दारूमुळे आदिवासींचे प्रस्थापित व्यवस्थेतील सेठ सावकाराकडून वारंवार शोषण झालेले आहे. याचाही उल्लेख करताना बाबाराव मडावी म्हणतात, "शहरातून रहायला आलेला प्यारेलाल सेठ मात्र गांवचा सावकार. तो या ठिकाणी वेठबिगारी राबवित होता. त्याच्या वाड्यातून सकाळीच कामावर येण्यासाठी जोर जोराने घंटा व्हायची. गावातील लोकांना पैसा वाटत असल्याने त्याचा जबरदस्त वचक होता. सावकार आपला आहे ही भावना त्यांच्यात रूढ झालेली. प्यारेलाल त्यांच्यापेक्षा वेगळाच वाटायचा. उंचापूरा धिप्पाड माणूस. पातळ धोतर. त्यावर पांढरं लांब लचक शर्ट व काळा कोट. पायात कोल्हापूरी जोडे. खांद्यावर शाला टाकलेली. गळ्यात सोन्याचा हार, उजव्या हाताच्या पाचही बोटात सोन्याच्या अंगठ्या. त्याचा हात जणू सोन्याचा. चेहऱ्यावर जाड मिश्या. रुबाबदार दिसायचा पण गांवातील आदिवासीचं शोषण करायचा. त्याचं शोषण लोकांच्या लक्षात येत नव्हतं. उलट प्यारेलाल साकरारच जणू सरकार मायबाप. त्याच्या ईशाऱ्यावर समदा गाव नाचायचा. त्याच्या समोर बालायची कोणाची टाप नव्हती. गावाची सत्ता तोच भोगायचा. आदिवासींना निवडणूकीच महत्त्व नव्हतं. त्यांचे अंगठे कोऱ्या कागदावर घेवून तोच सरपंच व्हायचा."[3] या वरील संदर्भावरून असे लक्षात येते की आदिवासींना जगलांच्या पलिकडील कोणताही व्यवहार, जगणं याची जाणीव नाही. त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण नाही. त्यामुळे त्यांचे वारंवार शोषण होत राहते. त्यांच्यात असणारी अंधश्रद्धा आणि त्यांच्या चालीरिती मध्ये शिक्षणाला महत्त्व दिलेले आढळत नाही.

टाहो या कादंबरीच्या केंद्रवर्ती भूमिकेतील भिम्या नायक आहे. दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींवर उच्च वर्णीय लोक आपल्या स्वार्थासाठी अन्याय-अत्याचार करतात. हे अन्याय अत्याचार सतत दाबून टाकण्याचा प्रयत्न केला जातो, तरुण

पिढीतील नवतरुनांनी शिक्षण घेतल्यामुळे अन्यायाविरूद्ध आवाज उठवितात. त्याचे प्रतिनिधित्व 'भिम्या' कसा करतो याचे चित्र बाबाराव मडावी यांनी उभा आपल्या कादंबरीतून उभा केलेले आहे.

सरकारने आदिवासींना दिलासा देणारी जमीन हस्तांतरणाचा कायदा केला पण त्यातून अनेक समस्याही उद्भवल्या आहेत. जमीनदार व आदिवासींमध्ये वैमनस्य कसे निर्माण होते. त्यातून प्राणघातक संघर्षाला कशी सुरुवात झाली आहे या संघर्षाचा इतिहास प्रस्तुत कादंबरीच्या बीज रूपात येतो. भिम्या हा शिकलेल्या तरुण आहे. त्याच्या प्रयत्नामुळे गावातील जमीनदार प्यारेलाल शेटला सजा होते. सावकाराच्या या पारंपरिक झोपड्यातून भिम्या आदिवासी बांधवांना मुक्त करणारा नायक आहे. याचे सर्व श्रेय तो शिक्षणाला देतो. त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व ओळखून तो आपल्या बांधवांसाठी रात्रीची शाळा सुरू करतो. भिम्या संविधानाची एक प्रत जंगलात आणतो. कारण इथल्या सरकारने केलेले कायदे माहित व्हावेत यासाठी समग्र परिवर्तनाचे स्वप्न पाहणारा भिम्या आशावादी असल्यामुळे डोंगर गावातील लोकांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करतो. गावातील आपल्या समाज बांधवांना निवडणूकीचे महत्त्व पटवून देतो. सावकाराकडून होणारे शोषण थांबविण्यासाठी स्वतः उभा राहतो व निवडणूकीत बाजी मारतो. तो गावचा सरपंच होतो. गावातील आरोग्याचे प्रश्न, अंधश्रद्धा संपवितो व लोकांच्या सावकाराने लुबाडलेल्या जमिनी परत करतो. सावकार प्यारेलाल कडून होणारे शोषण थांबवितो. अशा विविध विषयाशी संघर्ष करून या कादंबरीचे विषय बनून राहतो. या कादंबरीवरून हे लक्षात येते की, जमीन हस्तांतराचा कायदा आदिवासींपर्यंत पोहचला आहे. त्याचा लाभ त्यांना सावकारासारख्या श्रीमंताकडून मिळाला नाही. म्हणून आदिवासी समाजाला अंधश्रद्धा, अज्ञान, दारिद्रय, स्त्रियांचे लैंगिक शोषण व आरोग्याचे प्रश्न सावकारांकडून होणारा चाबकाचा मार सहन करीत जगावे लागते. परंतु भिम्याच्या शैक्षणिक व न्यायाच्या जाणिवेमुळे सावकाराला कारागृहात जावे लागते. गावात शिक्षणाच्या सेवा सुविधा, आदिवासींच्या आरोग्यासाठी दवाखाना, अंधश्रद्धा निर्मुलन होऊन लैंगिक व शारीरिक शोषण थांबवावे यासाठी प्रयत्न चालू असतात. नव्या परिवर्तनवादी व माणूसपणाचे हक्क मिळविण्यासाठीची सुरूवात 'टाहो' या कादंबरीतून

झालेली लक्षात येते. त्यामुळे भिम्या या केंद्रवर्ती भूमिका असणाऱ्या नायकाच्या मार्फत ते होत असल्याचे समजते.

**शैक्षणिक जीवन :**

टाहो मधील भिम्या नावाचा तरुण शिक्षणाकडे वढ घेतो. त्याने जंगल, जमीन सोडून शिक्षणासाठी शहराकडे धाव घेतली. मिमा दिसायचा सुंदर आणि गुटगुटीत असल्याने त्याला शहरातील एका नामांकित व्यक्तीने दत्तक घेतले होते. त्याचे चांगल्या पद्धतीचे शिक्षणही दिलेले होते. परंतु एके दिवसी आपल्या गावात आपल्या आई वडिलांना तो पत्राद्वारे कळवतो. शेवटी पत्र गावात आल्यानंतर आईवडिलांना आनंद होतो. भिम्याचे वडील रामा पतर आल्यावर गावात सांगू लागतो, "भिम्याचं पत्र आलेलं पाहून त्याचा बा राम्या भांबावून गेला. त्याला काय करावं काही सुचत नव्हतं. तो पळत सुटला, हे पहा माह्या भिमाचं पत्र बम्बईवरून आलया, पोर लई शिकलं, वकील होणार हाय. मह्या पोटचा गोळा येणार हाय. जलम होवून चार वर्षाचं झालं तवा मामलेदाराला देवून टाकला होता. मोठं झाल्यावर पाठविण्याची आण घातली होती. समद्या गावकऱ्यांना राम्या पत्र दाखवत पळत सुटला. सारे गांवकरी भिम्या एवढा शिकलेला पाहूनशान आश्चर्य व्यक्त करीत होते."[4] बाबाराव मडावी यांनी मांडलेला हा प्रसंग पाहून असे निदर्शनास येते की आदिवासी पाड्यावर किंवा वस्तीवर शिक्षणाचे प्रमाण एक टक्के आहे. राम्या पत्र घेवून पळत सुटला असेल किंवा त्याला आणि गावातील आदिवासी समाजाला भिम्याच्या शिक्षणाचा आनंद असला तरीही त्याने पाठवलेले पत्र कोणाकडून वाचून घ्यावे असा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे आदिवासींच्या वाट्याला येणारे शैक्षाणिक नुकसानही त्यातून दिसून येते.

**सांस्कृतिक जीवन :**

आदिवासींमध्ये सांस्कृतिक जीवनाला आगळे वेगळे स्थान दिलेले आहे. आदिवासी संस्कृती ही इतर जाती जमातींपेक्षा वेगळी आहे. त्याचे राहणीमान, जीवनमान व शहरापासून दूर राहिल्यानंतरही आपल्या माणसांबद्दलचे आकर्षण आदिवासींमध्ये कमी होत नाही. याचा उत्तम दाखला बाबाराव मडावी यांयी दिलेला आहे. भिम्याच्या या

घटनाप्रसांगाबद्दल अशी मांडणी करतात की, “पोराचे आदर्श विचार पाहून सारे गांवकरी टक लावून पहात होते. भिम्यानं सर्वांचा परिचय करून घेतला. शहरी संस्कृतीत वाढलेला पण जीवावर जीव टाकणारी ही जंगलातली माणसं पाहून तो थक्कच झाला. मुंबईला हे त्याला पहायला मिळालं नव्हतं. तसं त्यानं अनेक पुस्तकं वाचून आदिम संस्कृतीचा चांगलाच अभ्यास केला होता. भिम्याच्या आगमनानं डोंगरगावं सुखावला. सारे जण वाद्याच्या तालावर नाचायला लागले. असेल अभुतपूर्व स्वागत त्यानं ऐश्या आरामात वावरणाऱ्या श्रीमंत लोकातही पाहीलं नव्हतं. शहरात स्वागत समारंभ होतात पण भाड्याने आणलेले वाजंत्री आणून वातावरण तयार केले जाते. ही जंगलातली माणसं तर स्व:तच वाजवून आनंदाने नाचून स्वागत करतात. यांची स्वागत करण्याची पद्धत केवढी जिवंत आहे."[5] या वरील संदर्भावरून असे लक्षात येते की आदिवासी संस्कृतीमध्ये आज घडीलाही जिवंत माणवी संवेदना, जाणिवा आहेत. "आदिवासी साहित्य ही प्राचीन संस्कृतीचे लेणे आहे. ती जशी सांस्कृतिक आहे तशीच ती एक सामाजिक, साहित्यिक अंगातून वाटचाल करते. आदिवासी साहित्याचा आधार सांस्कृतिक जाणिवेतच शोधला पाहिजे. आदिवासी साहित्याचा प्रेरणा त्यांच्या सांस्कृतिक अधिष्ठानातच आहेत."[6] असे मत प्रा. डॉ. विनायक तुमराम मांडता. म्हणून आदिवसींची सांस्कृतिक देवाणघेवाण प्रस्तुत कादंबरीतून बाबाराव मडावी यांनी मांडलेली दिसते.

**राजकीय जीवन :**

बाबाराव मडावी यांनी टाहो या कादंबरीतील नायक उभा करताना त्याचा सर्वांगिन विचार केलेला आहे. आदिवासींचे प्रश्न त्याच्या माध्यमातून समाज स्तरावर उघडे पाडलेले आहे. पिढ्यानपिढ्या त्यांचे राजकीय शोषण झालेले पाहता कादंबरीतील नायक शिकून मोठा होतो आणि राजकीय क्षेत्रात सहभाग घेतो. याचा प्रसंग उभा करताना ते म्हणतात, “डोंगरगावची पंचायत निवडणूक लागली. निवडणुकहीचे महत्त्व या गावाच्या लोकांना नव्हते. दरवेळेस प्यारेलाल या गावाच्या लोकांना दारू, कोंबडं, बकरे खाऊ घालून सरपंचाचे पद पिडीजात उपभोगत आला होता. गावची संपूर्ण सत्ता त्याच्या घरात असायची. त्याच्याच मर्जीनुसार गावं चालायचा. लोकांना दारूच्या बाटलीत बुडवून ठेवून

सत्ता भोगणारा तो या गांवचा सत्ताधिश झाला होता. त्याच्या विरूद्ध उभं राहण्याची कोणाची हिम्मत नव्हती. गावच्या लोकांना पंचायत म्हणजे काय, प्रशासन कसे असते, त्यांच्यासाठी काय योजना आहे याचा थांगपत्ता नव्हता. निवडणूक हा प्रकार त्यांच्यापासून दूर होता. निवडणुकीच्या वेळेस मनसोक्त दारू आणि कोंबडं खायाला मिळतं यावरच सारे लोक जाम खुष असायचे. एका दिवासाच्या प्या खायला मिळालेल्या दारूच्या जेवणामुळं आपलं केवढं नुकसान आहे हे त्यांना कोण समजावून सांगणार. त्यांचं जंगलातलं जग वेगळंच होतं. मासाळलेली माणसं त्यांचं शोषण करीत होते हे त्यांच्या लक्षात येईना."[7] त्यांना आवश्यक तेवढे देवून वर्षानुवर्ष झुलवत कसे ठेवले आहे याचे स्पष्टीकरण वरील संदर्भातून येते . सोबतच राजकीय क्षेत्राची जनजागृती झाल्यावर काय होऊ शकते याचीही कल्पना बाबाराव मडावी यांनी टाहो मधून मांडलेली आहे.

**सांस्कृतिक जीवन :**

टाहो कांदबरीच्या माध्यमातून आंध जमातीचे सांस्कृतिक जीवन विषद केलेले आहे. बाबाराव मडावी यांनी आंध जमातीचे सण, उत्सव आणि लग्नविधीसारखे प्रसंग रेखाटलेले आहेत. बाबाराव मडावी यांनी आपल्या टाहो या कादंबरीतून व्यक्तिरेखांच्या संवादातून संस्कृतीचे चित्रण केले आहे. ते असे की, "राम्याची त्याच्या पोराकडूनं समजुत झाल्यानं राम्या हसाया लागला. त्यानं घाई घाई पाटीवर क कणसाचा, ब बेडकाचा, अस म्हनू अक्षर गिरवाया लागला. सदुकाका बोलला. भिम्या आज तु कावुन रडला रे पोरा, काका आपली संस्कृती किती आदर्श हाय. दुसऱ्याची समस्या जाणणारी. आपल्या पारश्या गरजा नाय. कुणी कुणाला फसवित नाय. एकमेकांवर जीव टाकून रहायचं. जीवनाचं फार मोठं तत्वज्ञान आपल्या जगण्यात हाय. मी तुम्हाला अडाणी वेगळ्या अर्थानं म्हणलं. तुम्ही निरक्षर आहात. बा ला राग आलाया. पण बा तुमच्या त्यागामुळं मी साक्षर झालुया. मुंबई सारख्या शहरातनं शिकलुया-पण तुमच्या आदर्श वागणुकीचा मला सखोल अभ्यास करावा वाटतो."[8] या वरील संदर्भावरून असे लक्षात येते की आदिवासी लोक माणूस म्हणून जीव्हाळा, प्रेम, त्याग हा त्यांच्यात दिसून येतो. शालेय शिक्षण त्यांच्यात नसले तरही ते संस्कृती संपन्न आहेत.

## समारोप व निष्कर्ष :

बाबाराव मडावी यांनी लिहिल्या टाहो या कादंबरीतून आदिवासी आंध जमातीचे प्रश्न मांडलेले आहेत. आदिवासी जमातींचे समाज जीवन कसे असते त्यांच्या जीवनावर सामाजिक , आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय परिणाम कसा झालेला आहे हे वरील शोधनिबंधातून दिसून येते. आपल्या न्याय हक्कासाठी आणि माणूस म्हणून आमचे काही आधिकार आहेत याची जाणीव करून देणारे टाहो ही बाबाराव मडावी यांची कादंबरी अत्यंत उपयुक्त आहे.

## निष्कर्ष :

1. टाहो या कादंबरीतून बाबाराव मडावी यांनी अन्यायाला वाचा फोडण्यासाठी प्रस्तुत कादंबरीची निर्मिती केलेली आहे असे दिसून येते.
2. टाहो या आदिवासींच्या कादंबरीतील लेखकाने अनेक आदिवासींचे प्रश्न हाताळलेले आहेत.
3. दारूमुळे आदिवासींचे प्रस्थापित व्यवस्थेतील सेठ सावकाराकडून वारंवार शोषण झालेले आहे.
4. आदिवासी कादंबरी ही आदिवासींच्या व्यथा, वेदना, दुख कष्ट व्यक्त करून थांबत नाहीत तर त्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य आदिवासी कादंबरी करीत असल्याचे दिसते.
5. आदिवासी साहित्य ही प्राचीन संस्कृतीचे लेणे आहे.

## संदर्भसूची :

1. वानोळे भीमराव, आदिवासी कथा-कादंबरीचे स्वरूप वाटचाल, मराठी वाङ्मय इतिहासाचे पुनर्लेखन, संकल्पना व स्वरुप, शिविम संशोधन पत्रिका त्रिमासिक, जाने-फेब्रु-मार्च 2024 अंक 37 पृ. क्र. 175
2. अशोक कांबळे Golden Research Toughts www.aygrt.isrj.net
3. टाहो पृ. क्र. 12-13
4. टाहो पृ. क्र. 31
5. टाहो पृ. क्र. 50
6. अशोक कांबळे Golden Research Toughts www.aygrt.isrj.net
7. टाहो पृ. क्र. 66
8. टाहो पृ. क्र. 70-71